मौ. पश्चिम सुपने (थोरात मळा) ता. कराड, जि. सातारा येथे कोयना नदीवर घाट व पूर संरक्षक भिंत बांधण्यास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक: प्रशामा-२०१६/(प्र.क्र. ५५०/२०१६)/सिं.व्य.(महसूल)
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक: ०८ नोव्हेंबर, २०१७.

<u>वाचा :</u> १) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळ, पुणे यांचे पत्र क्र. मकृखोविमं/३०/(८३१/२०१६)/प्रशा-४/४५५६/२०१६, दि. २३.११.२०१६.

<u>प्रस्तावना :-</u>

महाराष्ट्र कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळ, पुणे अंतर्गत **मौ. पश्चिम सुपने (थोरात मळा)** हे गांव कोयना नदीच्या डाव्या तीरावर वसलेले आहे. सदर ठिकाणी श्री शंकराचे पुरातन जोर्तिलिंग मंदीर व स्मशानभूमी आहे. कोयना नदीला वारंवार येणाऱ्या पूरामूळे मोठया प्रमाणात जमिनीची धुप (जमिनीचे सरकणे) झालेले असून धोका निर्माण झालेला आहे. महापूरामूळे होणारी जिवित व वित्त हानी टाळण्यासाठी सदर कामाची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व **ग्रामपंचायत पश्चिम सुपने, ता. कराड, जि. सातारा यांनी ठराव क्र. ५ , दि. ३०.७.२०१६** नुसार केलेली आहे. सदर बाब विचारात घेता **मौ. पश्चिम सुपने (थोरात मळा)** येथे कोयना नदीवर घाट व पूरसंरक्षक भिंत बांधण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

महाराष्ट्र कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळ, पुणे अंतर्गत मौ. पश्चिम सुपने (थोरात मळा) ता. कराड, जि. सातारा येथे कोयना नदीवर घाट व पूरसंरक्षक भिंत बांधण्याच्या कामासाठी **रू. १,१५,३६,८९२/-**(रू. एक कोटी पंधरा लक्ष छत्तीस हजार आठशे ब्यान्नव फक्त) एवढया खर्चाच्या अंदाजपत्रकाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	**कामाचा तपशिल**	**प्र. मा. रक्कम** (रूपयात)
१	**मौ. पश्चिम सुपने (थोरात मळा) ता.कराड जि. सातारा येथे कोयना नदीवर घाट व पूर संरक्षक भिंत बांधणे**	१,०३,९३,५९६/-
२	विमा १ %	१,०३,९३६/-
३	अनुषंगिक खर्च १० %	१०,३९,३६०/-
	एकूण	**१,१५,३६,८९२/-**

सदरच्या घाट व पूरसंरक्षक भिंत बांधण्याच्या कामासाठी **रू. १,१५,३६,८९२/-**(रू. एक कोटी पंधरा लक्ष छत्तीस हजार आठशे ब्यान्नव फक्त) एवढया खर्चाच्या जलसंपदा विभागाच्या सन २०१३-१४ व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१६-१७ च्या दरसूचीवर आधारित अंदाजपत्रकास खालील अटींच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

अ) १० % लोकवर्गणी स्थानिक संस्थेकडून प्राप्त झाल्यानंतर कार्यारंभ आदेश देण्यात यावे व काम पूर्ण झाल्यानंतर सदरचे काम स्थानिक संस्थेस परिरक्षणासाठी हस्तांतरीत करण्यात यावे.

ब) शासन परिपत्रक क्र.एफडीडब्ल्यु-१०९२/(१७०)/सिं.व्य.(कामे), दि.७.८.१९९२ नुसार कार्यवाही करावी.

क) शासन परिपत्रक क्र. एफडीडब्ल्यू-१०८९/२४३/८९/सिंव्य (कामे), दि. २१.९.१९८९ नुसार पुर रेषा आखणी केल्यानंतरच पूर संरक्षक भिंतीची संरेखा निश्चित करावी.

ड) अंदाजपत्रकात गृहीत धरलेले आराखडे/ संकल्पने, दरसूची बाहय बाबी व वहन अंतरे सक्षम स्तरावर तपासून अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्रदान करावी.

इ) कामाचा खर्च उपलब्ध अनुदानातून प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत व नियोजित वेळेत पूर्ण करावयाचा आहे.

ई) घाट व भिंतीच्या बांधकामासाठी भूसंपादन करू नये, बांधकामासाठी आवश्यक जमीन संबंधीतांनी विनामोबदला उपलब्ध करून द्यावी, घाट व पूर संरक्षक भिंतीच्या बांधकामामुळे नदीप्रवाहाला अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

प) पूर संरक्षक योजना राबविल्यानंतर परिसरातील पाण्याचा निचरा योग्य पध्दतीने होईल याची दक्षता नियोजनात घ्यावी.

फ) सदर योजना पूर्ण झाल्यानंतर घाट व पूर संरक्षक भिंत पश्चिम सुपने, ता. कराड ग्रामपंचायतीने ताब्यात घेऊन भविष्यातील देखभाल व दूरूस्ती करावयाची आहे. काम सुरू करण्यापूर्वी तसे लेखी बंधपत्र पश्चिम सुपने, ग्रामपंचायतकडून प्राप्त करून घ्यावे.

ज) सदरच्या कामांचा कार्यारंभ आदेश काढण्यापासून कामे पूर्ण होईपर्यंत त्रैमासिक प्रगती अहवाल शासनास सादर करावा. काम पूर्ण झाल्यानंतर त्याबाबतचे प्रमाणपत्र व ग्रामपंचायतीस हस्तांतरण करून हस्तांतरण टिप्पणी शासनास सादर करावी.

प्रस्तावित कामासाठी होणारा खर्च "४७११ पुरनियंत्रण प्रकल्पावरील भांडवली खर्च, १९०-सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणुका, (०१) सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणुका, (०१) (०१) महाराष्ट्र कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळ, पुणे भागभांडवली अंशदान (४७११ ०२०९)"या लेखाशीर्षाखाली करावा व मंजूर अनुदानातुन भागविण्यात यावा.

या कामास प्रदान करण्यात आलेली प्रशासकीय मान्यता सिं.व्य. (महसुल) कार्यासनाच्या नोंदवहीमध्ये क्र. १४ /सन २०१७-१८ वर नोंदविण्यात आलेली आहे.

हा निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.७५/१४३४ दि.२२.३.२०१७ अन्वये देण्यात आलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

प्रशासकीय विभागास प्राप्त अधिकार व आंतरवित्तीय सल्लागार व उप सचिव यांच्या सहमतीने हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११०८१५४४५०८५२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Atul Ashok Kapole

Digitally signed by Atul Ashok Kapole
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=797fcfe0bb4a86dd814129f50d05c1d249ea6f0acc364c6214f11ff7174bd5ef, serialNumber=ae2c4f4c985d3e984de94324901263d48766ec651dea49d652faf11a96aa98b5, cn=Atul Ashok Kapole
Date: 2017.11.08 15:36:46 +05'30'

(अ. अ. कपोले)
शासनाचे उप सचिव

प्रत :-

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे कार्यालय,
३. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई
४. मा.सभापती/उपसभापती, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई,
५. मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा,मुंबई यांचे कार्यालय,विधानभवन, मुंबई,
६. मा.विरोधी पक्षनेते, विधानपरिषद ,मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई,
७. मा.मंत्री, जलसंपदा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई,
८. प्रधानसचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक,जलसंपदा विभाग,मंत्रालय, मुंबई,
९. सचिव (जसंव्य व लाक्षेवि) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०. महालेखापाल-१ (लेखावअनुज्ञेयता/लेखापरीक्षा),महाराष्ट्र राज्य,मुंबई,
११. महालेखापाल-२ (लेखावअनुज्ञेयता/लेखापरीक्षा),महाराष्ट्र राज्य,नागपूर,
१२. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे,
१३. मुख्यअभियंता, (जसं), जलसंपदा विभाग, पुणे
१४. आंतरवित्त सल्लागार व उपसचिव,जलसंपदा विभाग,मंत्रालय, मुंबई,
१५. अधीक्षक अभियंता, सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली,
१६. कार्यकारी अभियंता, टेंभू उपसा सिंचन प्रकल्प व्यवस्थापन विभाग, ओगलेवाडी,
१७. सिं.व्य.(महसूल) कार्यासन संग्रहार्थ.